# गोडी अपूर्णतेची

केसरबाईंचा आणि लतातार्इंचा स्वर्गीय आवाज एकविसाव्या शतकात विज्ञानाच्या जादूने हातभर सीडी आणि बोटभर आयपॉडमधून सर्वसामान्यांच्या उशाशी पोचवला; तीन्ही-त्रिकाळ केव्हाही आणि कुठेही एका बोटाच्या इशाऱ्याने त्या सुरांचा आनंद जवळजवळ फुकटात लुटता यायला लागला. रेकॉर्ड केलेल्या अशा गाण्यांत साथीलाही मातब्बर मंडळी असतात; ध्वनिमुद्रणाची सगळी तंत्रं सांभाळून निष्कलंक, परिपूर्ण असा आविष्कार जपलेला असतो; तो दर वेळी बिनचूक, अगदी तस्साच्या तस्सा ऐकायला मिळतो.

याउलट मैफिलीला जायचं तर महागाचं तिकीट काढून त्या सभागृहापर्यंत धडपडत जावं लागतं. तिथे ऐन वेळी साथीचे कलाकार बदलतात; ध्वनि-योजनेत घोटाळा होतो; इतरही मानवी चुका होतात. तरीही शास्त्रोक्त गायनापासून सिनेगीतं, अगदी वग-तमाशांपर्यंत साऱ्या अशा कार्यक्रमांना आपण अजूनही तुडुंब गर्दी करतो. का आवडतात आपल्याला ते कार्यक्रम?

अशा कार्यक्रमांत आपण रसिक-श्रोतृवृंदाचा एक भाग असतो. त्या समूहभानाने आनंद शतगुणित होतो. वातावरण संगीताने मंतरलेलं असतं. आपला आवडता कलाकार आपल्याबरोबर एकाच सभागृहात, इतका जवळ आहे या जाणिवेने ती धुंदी वाढते. तो कलाकार तेवढा सारा वेळ खास आपल्यासाठी त्याची कला सादर करतो; आपल्या फर्माइशीचा मान राखतो; आपण दाद दिली की सुखावलेला दिसतो.

सीडीतलं गाणं पिंजऱ्यात बंदिस्त असतं. मंचावरचं गाणं मुक्तनिर्भर असतं. त्याची पेशकश उत्स्फूर्त असते. ‘कुहू कुहू बोले कोयलिया’ सारखं गाणं आयपॉडवर शेकडो वेळा ऐकून आपल्याला कणसुरांसकट पाठ झालेलं असतं. कुणी नवाच गायक ते मंचावर गायला लागला की त्यात चुका होण्याची शक्यता असतेच. सर्कशीतल्या झोपाळयावरचे चित्तथरारक खेळ बघताना जी धाकधूक असते तीच धाकधूक ‘सूर चुकेल का?’ या भीतीने वाटते. पण चुका झाल्या तर त्यांच्यातून गायकाची ‘माणुसकी’ पटते आणि आपुलकी वाटते. त्या ‘अपरिपूर्णते’ची गोडी अवीट बनते. स्टूडियोच्या मदतीशिवाय गाणं अप्रतिम साधलं तर कलावंताच्या कौशल्याची नव्याने प्रचीती येते. त्याने आत्मविश्वासाने गाताना काही नव्याच हरकती घेतल्या तर तो अपेक्षाभंगही मोठा सुखद वाटतो. काही भावनापूर्ण गाणी प्रत्यक्ष ऐकताना काळजाला अधिक भिडतात. प्रत्यक्षात गायली जाणारी गाणी श्रोत्यांच्या साक्षीने नव्याने घडतात! सर्जनाचे हे ताजे आविष्कार अनुभवणं एखाद्या मूर्तिकाराला मूर्ती घडवताना बघण्यासारखं असतं. तो वेळाचा रत्नखचित तुकडा श्रोत्यांच्या मनात कायम जपला जातो.

इतकी लयलूट अनुभवल्यावर आपण घरी येऊन न्हाणीघरातल्या नळाला आपल्या आवाजातली गाणी का ऐकवतो? आपल्या मनात त्या लयलुटीच्या आनंदाची उजळणी होते. संगीत निर्माण करू शकणारं, इतर प्राण्यांपाशी नसलेलं, अतिशय प्रगत असं स्वरयंत्र देवाने माणसाला दिलं आहे. तो दैवी चमत्कार आपल्यासाठी देखील घडला आहे या जाणिवेचा उत्स्फूर्त आनंदोत्सव साजरा होतो. आनंद व्यक्त करायची शब्दांची मर्यादा संपते तिथे संगीत सुरू होतं. म्हणूनच आपण आपल्याही आवाजात आनंदाने गातो.

डॉ. उज्वला दळवी

-ujjwalahd9@gmail.com

('esakal' च्या सौजन्याने)